**दिनांक २०.३.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच दिनांक १६.४.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.**

**(प्रशासकिय विषय)**

**विषय क्रमांक १७**:- न्यु प्रभात कॉलनी येथे मनपाचे जागेवरील विहीर बुजविण्याबाबत.

**ठराव क्रमांक १७** :- उपरोक्त विषयास अनुसरुन न्यु प्रभाग कॉलनी येथे मनपाच्या मोकळया जागेवरील विहिर बुजविणेबाबत २५ ते ३० नागरीकांचे निवेदन सन्मा.नगरसेवक यांना तसेच कार्यालयामध्ये प्राप्त झाले असून प्रभागामध्ये अभियंता यांनी या विहीरीची पाहणी असुन ही विहिर १० मिटर खोल व ३.६ मिटर व्यासाची आहे. सदर्हु विहिरीचा वापर कोणत्याही सार्वजनिक पाणी पुरवठयाकरिता तसेच पाणी वापराकरिता होत नाही. सदर्हु विहिर बुजविणे आवश्यक आहे. ही सभा उपरोक्त प्रशासकीय विषयास मंजूरी प्रदान करीत असुन, शहरातील ज्या विहिरी भविष्यातील पाण्याचे उपयोगीतेकरिता उपलब्ध होऊ शकत असतील अशा विहिरींची पुर्नबांधणी व सफाईची कार्यवाही प्रशासनाने यंत्रसहाय्याने सुरक्षीततेच्या दृष्टीने जाळी लावण्याबाबतची कार्यवाही करावी व ज्या विहिरी वापरायोग्य नसतील त्या बंद करण्याबाबतची कार्यवाही करावी असे ही सभा सर्वानूमते ठरविते.

ठराव सर्वानूमते मंजूर.

स्वा/-
नगरसचिव
महाागरपालिका, अमरावती

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महाागरपालिका, अमरावती

**दिनांक २०.०३.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात आलेला तसेच दिनांक १६.४.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय )**

**विषय क्रमांक २३**:- अंबा नाल्याला दि. १२.१०.२०१७ रोजी आलेल्या पावसामुळे नमुना व चुनाभट्टी या परिसरात निर्माण झालेली पुर परिस्थितीचे कारण व नाल्यावर झालेल्या बांधकामावर IIT Pawai, मुंबई यांच्या कडुन मत मागविणेबाबत.

**ठराव क्रमांक २३**:- अमरावती शहरातील मध्यवस्तीतून वाहणारा अंबानाल्यावर अंबा व एकवीरादेवी संस्थान म.न.पा. व शासन निधीतून एकविरा देवी मंदिर ते चुनाभट्टी पर्यंत मंदिराच्या भाविकांकरीता पार्किंग सोयीसाठी बांधकाम करण्यात आले आहे.

मागील काही वर्षापासून सदर नाल्याला अतिपावसामुळे नाल्यालगत असलेल्या नमुना व चुनाभट्टी या खोलगट भागात पाणी जमा होऊन पाण्याची पातळी वाढल्याने नागरीकांच्या घरात पाणी शिरुन पुरपस्थिती निर्माण होण्याची घटना निदर्शनास आलेली आहे. त्याअनुषंगाने म.न.पा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५६ दि. ११.०८.२०१६ चे निर्णयानूसार VNIT या संस्थेकडुन अंबानाल्याची सर्वकष पाहणी व तांत्रिक तपासणी करुन घेण्यात आलेली आहे. सदर तपासणी अहवाल नुसार कार्यवाही करण्याबाबत म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र. ४९ दि. १६.०६.२०१७ व सर्वसाधारण सभा ठराव क्र.३० दि. २६.०६.२०१७ झालेले आहे.

अमरावती शहरामध्ये दि. १२.१०.२०१७ रोजी पुन्हा झालेल्या अतिपावसामुळे नमुना व चुनाभट्टी, गौरक्षण चौक परिसरात पूरपरिस्थिती निर्माण होऊन नागरीकांच्या घरात पाणी शिरुन बऱ्याच प्रमाणात वित्त हानी झाली होती. यावर मा. आमदार श्री. सुनिल देशमुख यांनी आयुक्तांचे दालनामध्ये दि. १३.१०.२०१७ रोजी तातडीची सभा आयोजित केलेली होती, त्यानंतर दि. १८.१०.२०१७ चे आमसभेमध्ये व दि. ३०.११.२०१७ चे विशेष बैठकी मध्ये अंबानाल्यामधील अंबादेवी मंदिराच्या पार्किंगसाठी करण्यात आलेल्या बांधकामाचे आणि पुरस्थिती आटोक्यात येण्याकरीता करावयाच्या उपाययोजनेबाबत IIT मुंबई येथील तज्ञ प्राध्यापकांकडून संपुर्ण सर्व्हेक्षण करुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची कारवाई व्हावी असा निर्णय झाला होता त्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे दि. ०२.१२.२०१७ चे पत्रानूसार IIT पवई मुंबई या संस्थेचे दोन प्राध्यापक श्री. ज्योती प्रकाश आणि श्री. जांगीड यांनी दि. ०२.०२.२०१८ रोजी अंबानाल्याची संपुर्ण पाहणी केली यावर IIT पवई, मुंबई यांनी सदर कामाबाबत दि. २१.०२.२०१८ रोजी पत्र पाठवून अंबा नाल्याची १) पूरस्थिती निर्माण होण्याची तांत्रिक कारणे शोधणे २) नाल्यावर झालेल बांधकामावर मत देणे यासाठी करावयाच्या कामाची रुपरेषा व यासाठी

कन्सल्टंन्सी खर्च रु. १०.०० लक्ष + GST भरण केल्यावर परिपुर्ण अहवाल सादर करण्याचे म्हटलेले आहे तरी सदर खर्चावर चर्चा करुन निर्णय घेणेकरीता व पत्र  सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आले. ही सभा प्रशासनाने सादर केलेल्या उपरोक्त प्रशासकीय प्रस्तावास मंजुरी प्रदान करीत असुन सोबत सादर करण्यात आलेल्या पत्राचे अवलोकन करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर व कायम

स्वा/-
नगरसचिव
महाागरपालिका, अमरावती

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महाागरपालिका, अमरावती

**दिनांक २०.०३.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत  पारीत करण्यात आलेला तसेच दिनांक १६.४.२०१८ रोजीचे  सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय )**

**विषय क्रमांक २४:-** सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांची कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्याबाबत.

**ठराव क्रमांक २४** :- सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांची कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३,दि. १७.१२.२०१६ मध्ये प्रावधान आहे. त्या अनुषंगाने श्री.अ.एम.पोतदार, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता-१ यांची कार्यकारी अभियंता-१ या पदावर शासकिय अनुदानामधून करण्यात येणाऱ्या पायाभुत विकास कामाशिवाय इतर विवक्षित कामाकरीता सेवा करार पध्दतीने अकरा महिणे कालावधी करीता नेमणूक करण्याबाबत प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

तथापि, महानगरपालिका स्थानिक संस्था कर विभागातील करमुल्य निर्धारणाच्या व इतर विवक्षित कामाकरीता श्री.अ.ना पाटिल, सेवानिवृत्त विधी अधिकारी यांना रु. २५,३२३/- मासिक मानधनावर सहा महिने कालावधी करीता नेमणूक करण्याबाबत प्रशासनाची मान्यता प्रदान झाली असून प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस सादर करण्यात आला. या प्रशासकीय प्रस्तावास ही सभा सर्वानूमते मंजूरी प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर

स्वा/-
नगरसचिव
महाागरपालिका, अमरावती

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महाागरपालिका, अमरावती

**दिनांक २०.०३.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात आलेला तसेच दिनांक १६.४.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय )**

**विषय क्रमांक २५** :- श्री. डि.पी. मेश्राम, तत्कालीन कार्यकारी अभियंता तथा शहर अभियंता, महानगर पालिका अमरावती यांचे विरुध्दचे विभागीय चौकशी प्रकरणास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्रमांक २५** :- श्री. ज्ञानेंद्र प्रल्हाद मेश्राम, हे महानगरपालिका अमरावती येथे शहर अभियंता,म्हणून कार्यरत असतांना दि. ३०.०८.२०१५ रोजी महानगरपालिकेचे सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्त झाले. त्यांचेवर कार्यालयाचे ज्ञापन क्र. अमनपा/साप्रवि/आयुक्त/४४७/२०१६ दि. १३.०५.२०१६ अन्वये दोषारोपपत्र परिशिष्ट १ ते ४ संबंधीत कागदपत्रासह बजावण्यात आले त्यमध्ये त्यांच्यावर १) मे.जी.एच. खंडेलवाल, कंत्राटदार यांचे निविदे सोबत सादर केलेले बनावट कार्यपुर्ती प्रमाणपत्र स्वत:चे सहीने निर्गमित केले यावरुन कंत्राटदाराची संगणमत व पदाचा दुरुपयोग केला.२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत केलेल्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरिक्षण केले नाही. ३) माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असतांना त्यांच्या कालावधीत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विविध प्रकरण गांभिर्याने हाताळले नाही. त्यामुळे अर्जदार माहिती पासुन वंचित राहीले. ४) इर्विन ते बियाणी चौक व गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कुल ते शिवाजी पोस्ट ऑफीस पर्यंत दोन्ही रस्त्यांची डांबरीकरणाची कामे डिसेंबर, २०११ मध्ये कंत्राटानूसार केली. या कामाचा दोषदायीत्वाचा कालावधी ०९.१२.२०११ ते दि. १२.१२.२०१६ पर्यंत आहे. परंतू त्यांनी सदरील दोन्ही रस्ते अतिशय खराब झाले असताना सुध्दा कंत्राटदार मे.जी.एच. खंडेलवाल यांचेकडुन सदरील दोन्ही कामे अंदाजपत्रकातील बाबी नुसार पुन:श्च दुरुस्तीची कामे करुन घेतली नाही. ५) श्री डि पी मेश्राम यांचेकडे कार्यकारी अभियंता २ पदाचा पदभार असतांना त्यांचे कालावधीत दलित वस्ती योजने अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ७ कोटी प्राप्त झाले. ऑगस्ट २०१५ पर्यंत ६.५ कोटी रक्कम अखर्चीत होती त्यामुळे सदर योजनेचे उद्दीष्ट साध्य झाले नाही. ६) श्री डि पी मेश्राम यांचेकडे कार्यकारी अभियंता २ पदाचा पदभार असतांना महाराष्ट्र शासन रमाई आवास योजनेअंतर्गत सन २०१३-१४ वर्षासाठी २५.४४ कोटी रुपये प्राप्त झाले सदर्हु योजने अंतर्गत मनपाला १२७२ घरकुलाचे उद्दीष्ट देण्यात आले होते. परंतू त्यांचे अकार्यक्षमतेमुळे ऑगस्ट २०१४-१५ पर्यंत ६७० लाभार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात आले नाही. ५.४५ कोटी निधी शिल्लक राहीला. गरजुंना योजनेचा लाभ देता आला नाही. त्यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा जनमाणसात मलिन झाली. ७) श्री डि पी मेश्राम यांचेकडे कार्यकारी अभियंता २ पदाचा कारभार असतांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तीक शौचालय योजने अंतर्गत ८.२५ कोटी रु.प्राप्त झाले. परंतु सदर्हु रक्कम १ वर्षापर्यंत अखर्चीत ठेवली. वैयक्तीक

शौचालय व नळ जोडणी करीता ८.२५ कोटी रु. निधी प्राप्त झाला त्यामध्ये १६४ चेक एक ते दिड वर्ष प्रलंबित ठेवले. त्यामुळे खाजगी नळ जोडणी व वैयक्तीक शौचालय योजने उद्दीष्ट साध्य करता आले नाही. यासाठी श्री डि पी मेश्राम हे जबाबदार आहे. ८) श्री डि पी मेश्राम यांचेकडे कार्याकारी अभियंता २ पदाचा पदभार असतांना त्यांचे कार्यकाळात घोषीत झोपडपट्टी भागात घरकुलाचा लाभ देणे अनिवार्य असतांना श्री मेश्राम यांनी पदाचा दुरुपयोग करुन अघोषित घरकुले सुध्दा अभिन्यासामध्ये मंजुर केल्याचे आढळुन आले. त्यामुळे झोपडपट्टी निर्मुलन उद्दीष्टांची पुर्तता होऊ शकली नाही. ९) श्री डि पी मेश्राम यांचेकडे कार्यकारी अभियंता २ पदाचा पदभार असतांना त्यांचेकडे विविध विकास योजनेअंतर्गत खर्च करण्यासाठी प्राप्त निधीचे त्यांनी वेळेचे आंत त्यांचे नावे असलेली अग्रीम धनाची रक्कम रु. १०,५२,२५९/- चे समायोजन केले नाही. १०) श्री डि पी मेश्राम यांचेकडे कार्यकारी अभियंता २ पदाचा पदभार असतांना त्यांचे कार्यकाळात सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत उद्यान विकसीत करण्याची कामे होती. त्यात कंत्राटदाराशी करारनामे मुद्रांकित पेपर करणे आवश्यक असतांना करारनामे कोरे आढळुन आले. ११) श्री डि पी मेश्राम यांचकडे कार्यकारी अभियंता२ पदाचा पदभार असतांना अमरावती महानगरपालिका क्षेत्रात एकुण १५ उद्यान विकास कामे करण्यात आली. उद्यान विकसीत करतांना मंजुरी कामे विभागाव्दारे केलेली असुन मजुरी खर्च ४०% रुपये ७०,८७,८५६/- करण्यात आला परंतू या कामाची मोजमापे घेऊन मुल्यांकन करण्यात आले नाही. ही गंभीरबाब आहे. १२) श्री डि पी मेश्राम हे तत्कालीन वेळी शहर अभियंता (सध्य स्वेच्छा सेवानिवृत्त) म्हणून महानगरपालिका अमरावती येथे कार्यरत असतांना अंबानाल्यावर वाहनासाठी स्लॅब टाकुण वाहनतळाची निर्मीती करणे या कामासाठी २५०.०० लक्ष खर्च करण्यात आले परंतू यावर आपण तांत्रिक अडचणीचा विचार न करता दि. १६.१२.२०११ रोजी कार्यरंभ आदेश दिले. त्यामुळे सद कामावर झालेला खर्च रु. २००.०० लक्ष निष्फळ खर्च झाला यास श्री मेश्राम सर्वस्वी जबाबदार आहे.

वरील आरोपा संदर्भात कार्यालयाचे आदेश क्र. अमनपा/साप्रवि/आयुक्त/३०५३/२०१६, दि. १४.११.२०१६ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली . प्रस्तुत प्रकरणी श्री र का हुशारे, सेवानिवृत्त सह सचिव यांची नेमणूक करण्यात आली होती. त्या अनुषंगाने श्री डि पी मेश्राम यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. श्री डि पी मेश्राम महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी असल्यामुळे विभागीय चौकशी सुरु करण्याआधी नियुक्ती प्राधिकरणाची महानगरपालिका / मा. सर्वसाधारण सभेची पुर्व परवानगी प्राप्त करण्यात न आल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने सुरु असलेली विभागीय चौकशी रद्द केली आहे.

श्री डि पी मेश्राम यांचेवर विभागीय चौकशी नव्याने सुरु असल्यामुळे सदरच्या कारवाईस मा. सर्वसाधारण सभेने मान्यता प्रदान करावी ही विनती. अशा

आशयाचा प्रस्तावाचा सभेसमोर मान्यतेकरिता प्रशासनाने सादर केलेला आहे. ही सभा सर्वानूमते असे ठरविते की, श्री.डी.पी.मेश्राम यांचेवर प्रशासनाने एकुण १२ आरोप निश्चित केलेले आहेत. या सर्व आरोपांमधील आरोप क्र. ९ व आरोप क्रमांक ११ हे आर्थिक अनियमिततेशी निगडीत दिसून येत आहेत. आरोप क्र. १ ते ८, १० व १२ हे आरोप प्रशासकीय कामकाजातील अनियमिततेशी निगडीत असल्याने त्यासबंधात पुनर्विचार प्रशासन करु शकते असे या सभागृहाचे मत आहे. आरोप क्र.९ व ११ हे आर्थीक अनियमिततेसबंधी आहेत. ही सभा सर्वानूमते असे ठरविते की, उपरोक्त आरोपासबंधी कायदेशीर सल्ला घेण्यात यावा व त्यानंतर विभागीय खाते चौकशी प्राधिकारी म्हणून मा.आयुक्तांचे समाधान होत नसल्यास, विभागीय खाते चौकशी करुन ही विभागीय खाते चौकशी तिन महिन्यामध्ये पूर्ण करण्यात यावी असे ही सभा सर्वानूमते ठरविते.

ठराव सर्वानूमते मंजूर

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव | सभापती तथा महापौर, |
| महाागरपालिका, अमरावती | महाागरपालिका, अमरावती |

**दिनांक २०.०३.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात आलेला तसेच दिनांक १६.४.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय )**

**विषय क्रमांक २६**:- अमनपा शाळा क्र.१६ मराठी अंबिका नगर येथील शिकस्त इमारत पाडणेबाबत.

**ठराव क्रमांक २६** :- उपरोक्त मनपा शाळा क्र.१६ अंबिका नगर येथील दक्षिणेकडील व पश्चिमेकडील एकुण दहा वर्ग खोल्या पूर्णतः शिकस्त झालेल्या असून शाळेची विद्यार्थी संख्या लक्षात घेता सदर वर्ग खोल्याची आवश्यकता दिसत नाही. सदर शाळेच्या आवारात विविध कार्यक्रम तसेच परिसरातील लहान मुले खेळत असल्याने सदर ठिकाणी शाळेचा शिकस्त भाग कोसळल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत मा.आयुक्त यांनी शिक्षण विभागाच क्रिडा महोत्सव दरम्यान सदर शिकस्त शाळा पाडण्याबाबत प्रशासकीय प्रस्ताव आमसभेमध्ये पाठवून मंजूर घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच याबाबत सन्मा.सदस्य श्री.बलदेव बजाज व सौ.पद्मजा कौंडण्य ंनी यापूर्वी सदर शिकस्त शाळा पाडण्याबाब सूचना केलेल्या आहेत. सदर इमारत अंदाजे २५-३० वर्षापूर्वीची असल्याने व अतिशय जिर्णावस्थेत असल्याने तसेच या इमारतीचा शाळेकरिता कोणताही वापर होत नसल्याने सदर शिकस्त इमारत पाडणे अतिशय आवश्यक आहे. वरील प्रमाणे प्रशासकीय प्रस्तावास ही सभा सर्वानूमते मंजूरी प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव | सभापती तथा महापौर, |
| महाागरपालिका, अमरावती | महाागरपालिका, अमरावती |

**<u>दिनांक २०.३.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पारित व त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>(प्रशासकिय विषय)</u>**

**<u>विषय क्रमांक २२</u>**:- अमरावती शहर भुयारी गटार योजना लालखडी येथील ३०.५० द.ल.ली.क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्राची देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक रक्कम रुपये २५ लाख महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती यांना देणेबाबत.

**<u>ठराव क्रमांक २२</u>** :- अमरावती भुयारी गटार योजना अंतर्गत लालखडी येथे 30.5 द.ल.ली. क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्र मजीप्रा तर्फे बांधण्यात आलेले असून ते दि. 31/3/2013 पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तेव्हापासून दि. 30/04/2017 पर्यंत मजीप्राने मलशुद्धीकरण केंद्राची देखभाल दुरुस्ती केली, तद्नंतर संदर्भांकित ठराव क्रमांक ४१ दि. ६/०६/२०१७ च्या अनुषंगाने हया मलशुद्धीकरण केंद्राची देखभाल व दुरुस्ती करिता एकूण रु. ६५ लाख वार्षिक खर्चा पैकी रुपये ४० लाख विद्युत देयकापोटी मनपातर्फे करारानुसार करण्यात येतो. उर्वरित निधी रुपये २५ लाख वार्षिक मनपातर्फे मजीप्रास सन- २०१७ - १८ या आर्थिक वर्षात दि. १३/०९/२०१७ रोजी रुपये १२.५ लक्ष व दि. २६/१२/२०१७ रोजी रुपये १२.५ लक्ष असे देण्यात आले आहे.

मा. कार्यकारी अभियंता मजीप्रा अमरावती यांचे दि. ६/०२/१८ अन्वेय माहे. एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या आर्थिक वर्षाकरिता मलशुद्धीकरणाच्या देखभाल - दुरुस्ती पोटी एक रक्कमी रु. २५ लक्ष ची मागणी केलेली आहे.यु आय डी एस एस एम टी योजनेसंदर्भात अमरावती महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात दिनांक २०/०१/२०१० रोजी झालेल्या अटी व शर्ती तील अट क्रमांक - १४ नुसार ऱ्योजना कार्यान्वित झाल्यानंतर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ३ वर्ष करावयाची आहे सदर तीन वर्षाचा देखभाल दुरुस्ती कालावधीत येणाऱ्या खर्चापोटी (ज्यामध्ये आस्थापना निवृत्ती वेतन अंशदान इत्यादी खर्चाचाही समावेश असेल) आगाऊ म्हणून संभाव्य सरासरी एका वर्षाची रक्कम मजीप्रा कडे जमा करणे आवश्यक आहेछ असे नमूद आहे परंतु सदर योजनेतील प्रापर्टी कनेक्शन अद्यापही पुर्ण झालेले नाही. अशा परिस्थितीत योजना कार्यान्वित झाली असे गृहीत धरता येणार नाही.

अशा परिस्थितीत मलशुद्धीकरणच्या देखभाल दुरुस्तीपोटी दरवर्षी रुपये २५ लक्ष मजीप्रास द्यावयाचे असल्यास त्या बाबत निश्चित धोरण ठरविणे आवश्यक आहे. मा. आयुक्त हयांनी दि. ०७/०३/२०१८ रोजी हयाबाबत अभिप्राय दिला आहे की स्थायी समिती मार्फेत पुढिल

कामाकरीता देखभाल दुरुस्ती पोटी दयावयाच्या रक्कमेसाठी धोरणात्मक निर्णय घ्यायचा असल्याने विषय सर्वसाधारण सभेत पाठविण्यात येत आहे. ही सभा सर्वानूमते उपरोक्त प्रशासकीय प्रस्तावास मंजूरी प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव | सभापती तथा महापौर, |
| महाागरपालिका, अमरावती | महाागरपालिका, अमरावती |